राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र. रामाआ/२२५६/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१.

.श्री.विष्णू आनंदा माने. — अपिलार्थी

विरुध्द.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत गोटेवाडी, ता. तासगाव, जि. सांगली. — उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथाविस्तार अधिकारी (पंचायत) ,
पंचायत समिती तासगाव, जि. सांगली.

द्वितीय अपील सुनावणी दिनांक २०/१२/२०२१

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४/०३/२०१७ | ०५/०४/२०१७ | १५/०४/२०१७ | ०८/०५/२०१७ |

अपिलार्थी यांनी दि१५/०५/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

प्रस्तुत द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी सेवानिवृत्त आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जोडपत्र 'अ' मध्ये जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

'वडिलोपार्जित मिळकतीचे फेरफार त्या संबंधीचे अभिलेख व ८ अ उतारे माहिती (सन १९६६ ते २०१७) इ. माहिती.'

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये ' एकाच प्रकारची माहिती मिळणे अपेक्षित ' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक १४/०३/२०१७ रोजीचा असुन तो तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत गोटेवाडी, ता. तासगाव, जि. सांगली यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे.

२) सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी असे सांगितले की, माझी वडिलोपार्जीत मिळकत दुस-याच्या नावे हस्तांतरीत केलेली आहे, त्याबाबतचे फेरफार व इतर अभिलेख मागितलेले आहेत. मला उडवाउडवीची माहिती दिली.

३) अपिलार्थीचे प्रथम अपिल दिनांक १५/०४/२०१७ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०८/०५/२०१७ रोजी आदेश दिला असून त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती ग्रामपंचायतीकडील उपलब्ध असलेल्या दप्तरानुसार १०० पृष्ठांपर्यंत मोफत देणेत यावी.

४) सुनावणीचेवेळी तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीस दि.५/४/२०१७ च्या पत्राने उपलब्ध माहिती पुरविली असून उर्वरीत माहिती उपलब्ध नाही असे कळविले आहे. पुरविलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर माहिती उपलब्ध नसल्याने व उपलब्ध माहिती प्रथम अपिल आदेशापूर्वीच माहिती पुरविली असल्याने सदर आदेशानुसार पुन्हा माहिती पुरविली नाही.

५) तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशाची अंमलबजावणी न करुन अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात

६) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला आहे, परंतु आदेशाची अमंलबजावणी झाली किंवा कसे याबाबत खात्री करणे आवश्यक होते परंतु तसे केले नाही. त्यामुळे अपिलार्थी परिपुर्ण माहितीपासुन वंचित राहिलेले आहेत.

७) अपिलार्थीस अंशत: माहितीचे प्रदान झालेले नाही

८) अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना 'खरी माहिती मिळणेबाबत.' असे प्रयोजन नमूद केले.

सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन माहितीचे अवलोकन द्यावे, अवलोकनांती, त्यांनी चिन्हांकित केलेल्या माहितीच्या छायाप्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत टपालाव्दारे विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२) तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत गोटेवाडी, ता. तासगाव, जि. सांगली यांनी प्रथम अपिल आदेशाची अंमलबजावणी न करुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुद्ध कलम २० मध्ये नमुद तरतूदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचे विरुद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र. 1375/2022/(रामाआ) 2256/2017 दिनांक - 13/6/2022

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित</u>-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/ प्र. क्र. २१९/०८/९(मा. अ.), दि. १०/०६/२००८ मधील सूचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना (नोंदणीकृत टपालाद्वारे)सदरचा आदेश बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.